ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052 (UIF) Volume - 6 | Issue - 2 | August - 2016

Golden Research Thoughts

# संत नामदेव : अभंग संपदा

तुंगे विनोद अनिलराव
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ , संचलीत , कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय
ता. लोहारा जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)

## प्रास्ताविक :--

भागवत धर्माचा पताका ज्याने पंजाबपर्यंत नेऊन भिडवणारे संत नामदेव यांची भागवत संप्रदायातील कामगिरी सर्व संताहुन सरस आहे असे आपणास म्हणता येईल . मराठयांनी आटकेपार आपला आसनारा झेंडा लावला. त्याचप्रमाणे भागवत धर्माच्या प्रसाराची कामगिरी पंजाबमध्ये जाउन हरिनामाचा प्रचार आणि प्रसार केला म्हणुन संत नामदेवांना भक्तशिरोमणि म्हणुन गौरविले जाते.

ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रात 'ब्रम्हविद्येचा सुकाळ' केला तर नामदेवांनी 'हरिनामाचा सुकाळ' केला . आपल्या आसनाऱ्या आमृतमय व रसाळ वाणिच्या जोरावर त्यांनी सर्वांना वेड लावले. नामदेवाची अभंगवाणी म्हणजेच त्याच्या आसणाऱ्या उदात्त, प्रसन्न , भाववेडया, सोज्वळ व निष्पाप अशा व्यक्तिमहत्वाच्या आविष्कार याच्यामध्ये आहे. आपल्या आसणाऱ्या कला व शैलिदार लेखनाने त्यांनी भागवत धर्माला शोभेल अशा प्रकारच्या लेखनाच्या नियमांचा अभुतपुर्वक असा विचारविनीमय त्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.नामदेवाच्या आसणाऱ्या वेगळेपनाचे वैशिष्टय म्हणजेच त्याच्या आसणाऱ्या लेखनाच्या आधारावर करता येते.

## ज्ञानेश्वराचे चरित्र :

संत नामदेवांनी ज्ञानेश्वरांचे चरित्र काव्यबदध केले आहे. आदि ,समाधी आणि तीर्थावळी या तिन प्रकरणातुन त्याचे आसणारे हे चरित्र साकार केले आहे. या तिन्ही प्रकरणांची अभंग संख्या सुमारे साडेतिनशे आहे. तिर्थावळी व समाधी ही दोन प्रकरणे नामदेवांनी आगोदर लिहीली आणि ज्ञानेश्चराच्या चरित्राला परिपुर्णता यावी म्हणुन 'आदि' हे प्रकरण नंतर लिहुन पुर्वीच्या दोन प्रकरणांना जाडले.ज्ञानेश्वरांविषयी आसणारा आदर आणि प्रेमभाव या आभंगातुन व्यक्त झालेला आहे या तिन भावंडाचे वर्णन करतांना ते म्हणतात.

तिन्ही दैव जैसे , परब्रम्हीचे ठसे ।
जगी सुर्य जैसे प्रकाशले ।

ज्ञानेश्वर महाराजांना जेंव्हा समाधिस्त झाल्यावर आपली म्हणजेच नामदेवाची आवस्था कशी झाली, हे सांगताना नामदेव लिहतात,

कोण जाणे माझे जीवीचा कळवळा । प्रेमाश्रु डोळा लोहताती ॥
नामा म्हणे येथे बोलवेना आज । जातसे निजगुज आवडीचे ॥

या अशा आसनाऱ्या रसाळवाणिच्या माध्यमातुन मनाचा आसनारा हविरभाव जींकण्याचे काम जणु नामदेवांनीच आपल्या आसनाऱ्या लेखनाच्या आधारे केले आहे.



## आत्मचरित्रपर अभंग :-

संत नामदेवाची आभंगवाणी हि कमालीची उत्कट आणि हळुवार अशी आहे.
अंतर्मुखता , आत्मतत्परता आणि जिव्हाळा हे नामदेवाच्या कवितेचे ठळक वैशिष्ठय आहेत. संसारापासुन आलिप्तता , विठ्ठलाची ओढ,विठ्ठल भक्तीची आर्तता, विठ्ठलाच्या चरणी शरणागती आणि विठ्ठलाचे दर्शन झाल्यावर होणारा परमानंद आसे आनेक भाव नामदेवावर अभंगातुन आविष्कृत झालेले आहेत.नामदेवांचे आसणारे भावजिवन म्हणजेच त्यांची आसणारी आभंगवाणि होय. विठ्ठलभेटीच्या आनंद नामदेवांनी कसा चिञीत केला आहे ते पहा.

तु अवकाश मी भुमिका । तु लिंग मि साळुंका ।
तु समुद्र मि द्वारका । स्वयें दोन्ही ॥
तु वृंदावन मी चिरी । तु तुळशी मी मंजरी ।
तु पावा मी मोहरी । स्वयें दोन्ही ॥
तु चांद मी चांदणि । तु नाग मी पद्मीनी ।
तु कृष्ण मी रुक्मीणी । स्वयें दोन्ही ॥
तु नदि मी थडी । तु तांरु मी सांगडी ।
तु धनुष्य मी भातोडी । स्वयें दोन्ही ॥
तुं वेद मी स्तविता । तु शास्त्र मी गीता ।
तुं गंध मी आक्षता । स्वयें दोन्ही ॥
नामा म्हणे पुरूषोत्तमा । स्वयें जडलो तुझ्या प्रेमा ।
मी कुडी तुं आत्मा । स्वयें दोन्ही ॥

 Volume - 6 | Issue - 2 | August – 2016

संत नामदेवांनी उपदेशापर आसणारी संसाराची आसरता आपल्या आसणाऱ्या आभंगाच्या माध्यमातुन पटवलेली आहे. श्रीकृष्ण , विठठल याची सुंदर अशी रेखाटणे. त्यांनी आपल्या आसणाऱ्या अभंगाच्या जोरावर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**"आमृताहुनि गोड नाम तुझे देवा"**

हा त्यांच्या आसणारा आभंग प्रसिदधच आहे. या नामदेवाची असे अनेक आत्मचरित्रपर असे ४९१ आभंग प्रसिदध आहेत सगळयाचा मनावर एक अभुतर्पुक प्रसिदधी यांनी आभंगाच्या आसणाऱ्या आधारावर मांडली आहे.

**समारोप :**

संत नामदेव यांनी वारकरी संप्रदायाचा असणारा प्रसार हा वेगवेगळया गावामध्ये जावुन केलेला आहे. समाजमनावर विठ्ठलाचे असणारे निसिम्म भक्त निर्माण करण्याचे कार्य या थोर अशा संताने केलेले आहे. खऱ्या अर्थाने नामदेवांनी लोकामध्ये एक जाणिवता ईश्वराविषयी निर्माण केलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) मराठी वाङमयाचा विवेचक अभ्यास - प्र. न . जोशी
२) मराठी वाङमयाचा इतिहास भाग पहिला - आवृत्ती २
३) आभंगवाणी - संत नामदेव



**तुंगे विनोद अनिलराव**
**मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ , संचलीत , कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय लोहारा ता. लोहारा जि. उस्म (महाराष्ट्र)**